॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१० (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जैवशास्त्र प्रशाळेतील अद्ययावत सभागृहाचे उदघाटन व रिसर्च, पेटंट पब्लीकेशन ॲवार्ड व स्वयंम कोर्सेसमधील सर्वोत्कृष्ट ठरलेल्या विद्यार्थ्यांना पुणे येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे मुख्य शास्त्रज्ञ प्रा. अशोक गिरी व कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी मंचावर पुणे येथील रासायनिक प्रयोगशाळेचे शास्त्रज्ञ प्रा. रामरूप सरकार, सेवा निवृत्त मुख्य शास्त्रज्ञ प्रा.एम.व्ही. बडीगर, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.जे.व्ही. साळी व जैवशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. भुषण चौधरी हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस जैवशास्त्र प्रशाळेतील अद्ययावत सभागृहाचे उद्घाटन प्रा. अशोक गिरी यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटकीय भाषण करतांना प्रा. अशोक गिरी यांनी संशोधक विद्यार्थ्यांना सांगितले की, इंग्रजी भाषेचा न्यूनगंड ठेवू नका तुम्ही जरी मराठी माध्यमातून शिकला असाल तरी तुमची संकल्पना संशोधनात महत्वाची ठरते. कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांनी अध्यक्षीय भाषणात विद्यापीठाने संशोधनासाठी सुरु केलेल्या योजनांचा लाभ घ्यावा असे सांगून ध्येय निश्चित करून स्वत: रोल मॉडेल व्हा अशा पध्दतीने जीवनात यशस्वी व्हा असे सांगितले. प्रास्ताविक प्रा. भूषण चौधरी यांनी तर स्वयंम कोर्सेसची माहिती जयदीप साळी यांनी दिली.

यावेळी कुलगुरु संशोधन प्रोत्साहन योजने अंतर्गत रिसर्च पब्लीकेशन ॲवार्ड - २०२५ मिळालेल्या विद्यापीठीय रसायन तंत्रज्ञान संस्थेतील एकनाथ कोले, धनंजय पगारे, जगदीश वानखेडे, रसायन शास्त्र प्रशाळेतील प्रतिक वाघ, गणितशास्त्र प्रशाळेतील ललिता नेरकर, पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेतील प्रज्ञा केदार व योगिता पाटील यांना प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देण्यात आले. पेटंट पब्लीकेशन ॲवार्ड - २०२५ जगदीश वानखेडे या संशोधक विद्यार्थ्यास देण्यात आला. या कार्यक्रमात स्वयंम कोर्सेसमध्ये राष्ट्रीय पातळीवर सर्वोच्च १% यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांमधील जैवशास्त्र प्रशाळेतील इशा पटेल व सर्वोच्च ५% यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांमधील भौतिकशास्त्र प्रशाळेतील रोहन बोरसे यांना प्रमाणपत्र देवून गौरवांकित करण्यात आले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून राष्ट्रीय विज्ञान दिवस व इतर स्पर्धांमधून जैवशास्त्र प्रशाळा व भौतिकशास्त्र प्रशाळेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके मंचावर वरील मान्यवरांच्या हस्ते देण्यात आलीत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सहायक कुलसचिव प्रवीण चंदनकर यांनी केले तर जैवशास्त्र प्रशाळेच्या पुरस्कारांची घोषणा प्रा. प्रवीण पुराणिक व भौतिकशास्त्र प्रशाळेच्या पुरस्कारांची घोषणा प्रा. गौरी घोष यांनी केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १० मार्च, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१० (प्रतिनिधी) : बोली भाषांमुळे मराठी भाषा प्रगल्भ झाली आहे. साहित्यिकांमुळे खानदेशातील अहिराणी भाषा ही गल्ली पासून ते जागतिक स्तरापर्यंत पोहोचली आहे असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक अहिराणी साहित्यिक कृष्णा पाटील यांनी केले. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व विद्यार्थी विकास विभागातर्फे चौथे बहिणाबाई विद्यार्थी साहित्य संमेलन कार्यक्रमाचे आज दि. १० मार्च रोजी प्रताप तत्वज्ञान केंद्र, अमळनेर येथे आयोजित करण्यात आले होते या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. एस. टी इंगळे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य व संमेलनाचे स्वागताध्यक्ष राजेंद्र नन्नवरे, व्य. प. सदस्य व कार्याध्यक्ष नितीन झाल्टे, बोली भाषा अभ्यासक डॉ. अशोक कोळी, अधिसभा सदस्य केदारनाथ कवडीवाले, डॉ. कांचन महाजन, प्रा. संदीप नेरकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी, प्रभारी अधिष्ठाता प्रा. जगदीश पाटील, प्रताप तत्वज्ञान केंद्राचे मानद संचालक डॉ. मनीष करंजे, प्रा. जयेंद्र लेकुरवाळे उपस्थित होते.

पुढे बोलताना त्यांनी भाषणाची सुरवात अहिराणी भाषेतून करत विद्यार्थ्यांशी आत्मीय संवाद साधला. विद्यार्थ्यांना मोठे स्वप्न पाहण्याचा व जीवनात ठाम संकल्प करा, मेहनत आणि सातत्य असेल तर कोणतीही गोष्ट अशक्य राहत नाही. स्वतःला सिद्ध करायचे असेल तर कठोर परिश्रम आणि चिकाटी आवश्यक आहे, असे ते म्हणाले. “अहिराणी ही केवळ बोली भाषा नसून ती आज गल्लीपासून जागतिक स्तरापर्यंत पोहोचली आहे, तिच्या साहित्यिक परंपरेमुळे आणि संशोधनामुळे तिचे महत्त्व वाढत आहे,” असेही त्यांनी स्पष्ट केले.

बोली भाषा अभ्यासक डॉ. अशोक कोळी यांनी “चिमण्यांनो जरा धीर धरा रे, विनाशाचा रस्ता नाही बरा रे…” या कवितेने आपल्या भाषणाची सुरुवात करत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये साहित्यिक गुण विकसित व्हावेत आणि दर्जेदार साहित्यिक घडावेत या उद्देशाने या साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. आज इंटरनेटच्या प्रभावामुळे तरुणांचा मातीशी व संस्कृतीशी असलेला संबंध कमी होत चालला आहे. फक्त शिक्षण घेऊन तरुण साहित्यिक होता येत नाही, तर त्यासाठी आपल्या संस्कृतीशी आणि मातीतल्या वास्तवाशी नाळ जोडावी लागते, असेही त्यांनी सांगितले.

साहित्य संमेलनात बोलताना व्य प सदस्य राजेंद्र नन्नवरे यानी खानदेशचे खरे वैभव म्हणजे येथील विविध बोलीभाषा असून त्या जतन करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कोरोना काळानंतर वाचन व लेखनाची सवय काही प्रमाणात कमी झाल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी अधिकाधिक वाचन केले पाहिजे, कारण जितके वाचन वाढेल तितके व्यक्तिमत्व आणि विचार समृद्ध होतात, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रास्ताविकात विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. चंद्रशेखर वाणी यांनी विद्यार्थी साहित्य संमेलनाच्या आयोजनाचे महत्व सांगितले. या साहित्य संमेलनात ३० महाविद्यालयातील जवळपास १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी विकास विभागाचे जिल्हा समन्वयक डॉ. संजय पाटील यांनी तर प्रताप तत्वज्ञान केंद्राचे मानद सचिव मनीष करंजे यांनी आभार व्यक्त केले.

कवयित्री बहिणाबाई सभागृहात काव्यवाचन, पुज्य सानेगुरूजी सभागृहात कथाकथन, श्रीमंत प्रतापशेठ सभागृहात बोलीभाषा सादरीकरण झाले. विद्यार्थ्यांनी यासर्व प्रकारात उत्साहाने भाग घेतला. काव्यवाचनात ५८ विद्यार्थी सहभागी झाले. आई, शेती, शेतमजूर, जीवन, प्रेम, आधुनिक तंत्रज्ञान असे अनेकविध विषय विद्यार्थ्यांनी हाताळले असून कवितांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सानेगुरूजी सभागृहात झालेल्या कथाकथनमध्ये १४ विद्यार्थी सहभागी झाले. पर्यावरण संवर्धन, आईवडिलांचे संगोपन, नैतिक मूल्ये, ग्रामीण जीवन, भारतीय संस्कृती असे विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी कथानक सादर केले. श्रीमंत प्रतापशेठ सभागृहात बोलीभाषा सादरीकरणात २० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. अहिराणी भाषेत वसतिगृहातील जीवन शेतकरी आणि गाव, ग्रामीण भाग, महिलांच्या समस्या असे विषय विद्यार्थ्यांनी हाताळले. या तीनही स्पर्धांचे परीक्षण डॉ. वासुदेव वले, डॉ. प्रशांत लगडे, डॉ. संदीप माळी, डॉ.किशोर पाठक, डॉ. रमेश माने, डॉ. मधुचंद्र भुसारे, डॉ. माणिक बागले, डॉ. सचिन पाटील, डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी व्य प सदस्य डॉ. शिवाजी पाटील, डॉ जगदीश पाटील, अधिसभा सदस्य प्रा. संदीप नेरकर, डॉ. कांचन महाजन, ऋषिकेश चित्तम आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी संमेलनात उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १० मार्च, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता